महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

**सुधारपत्र क्र. १०६ दिनांक १४ / ०१ / २०२६**
**(म.रा.वि.वि.कं.मर्या. वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५)**

**विषय: राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदावर आरक्षण देणेबाबत.**

**संदर्भ:** १) वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम -२००५ चे सुधारपत्र क्र. २२ दि. ०६.०४.२०१०.
२) वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम -२००५ चे सुधारपत्र क्र. ३३ दि. १५.०९.२०१०.
३) वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम -२००५ चे सुधारपत्र क्र. ६६ दि. ०७.०४.२०१६.
४) वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम -२००५ चे सुधारपत्र क्र. ८३ दि. १५.११.२०१९.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पारित करण्यात आलेल्या शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.०१.०७.२०१६ व शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.११.०३.२०१९ च्या धर्तीवर राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना कंपनीमधील वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांवर ५% समांतर आरक्षण अंगिकृत करून त्याबाबतच्या सर्व समावेशक सूचना म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५ चे सुधारपत्र क्र. ८३ दि.१५.११.२०१९ अन्वये पारीत करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय दि.३०.०६.२०२२, दि.२८.०५.२०२५, दि.०१.०७.२०२५ तसेच दि.०५.०९.२०२५ अन्वये राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना सरळसेवा भरतीकरीता आरक्षण लागू करण्याकरीता सुधारीत धोरण प्रसारीत केलेले आहे. त्या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५, मधील **परिशिष्ट - 'ढ' (Appendix-L)** सुधारीत करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

३. सबब, सुधारपत्र क्र.८३ दि.१५.११.२०१९ अधिक्रमित करण्यात येत असून म.रा.वि.वि.कं.मर्या.वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम २००५ चे सुधारीत **परिशिष्ट - 'ढ' (Appendix-L)** सोबत जोडलेल्या **जोडपत्र -'अ'** नुसार राहील.

४. सदरचे सुधारपत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

५. सदर सुधारपत्र कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत** : जोडपत्र 'अ'

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं)/ म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**जोडपत्र -'अ'**

**परिशिष्ट 'ढ'**

(वाचा : सेवाप्रवेश विनियम क्र. ३८ खालील टिप क्र १(xii))

**राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांवर सरळसेवेव्दारे ५% समांतर आरक्षण देण्याबाबतच्या तरतुदी.**

१. **क्रीडा विषयक अर्हता:-**

| वेतनगट | क्रीडा विषयक अर्हता | खेळविषयक पात्रता | |
|---|---|---|---|
| | | वैयक्तिक स्पर्धा | सांघिक स्पर्धा |
| १ | i) अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>ii) पॅरा ऑलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा<br>iii) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>iv) आंतरराष्ट्रीय शालेय महासंघा- द्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) ग्रॅन्डमास्टर किताब<br>**(टिप-** उपरोक्त नमूद अ.क्र. i, iii व iv या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळाचे ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ग्रॅन्डमास्टर किताब/ ऑलिम्पिक व पॅरॉलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग. | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक. |
| २ | वेतनगट - १ पदाकरीता विहित केलेली खेळ विषयी अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा<br>i) अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील<br>ii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट<br>**iii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट**<br>iv) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा<br>v) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा<br>v) राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>**vii) भारतीय खेळ प्राधिकरणाद्वारे (साई द्वारे सन २००८-०९ ते २०१३-१४ कालावधीत आयोजित) १६ वर्षाखालील शालेय क्रीडा स्पर्धा**<br>**viii) केंद्रीय क्रीडा मंत्रालयामार्फत भारतीय खेळ प्राधिकरणाद्वारे आयोजित झालेल्या/होणाऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स**<br>ix) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>x) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा<br><br>**(टिप: अ.क्र. i, ii, iii, v, vi, vii, viii व ix या स्पर्धामधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळ ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.)** | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना/ महाराष्ट्राचे/विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक/ अथवा आंतराराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक. | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने/ महाराष्ट्राच्या/विद्यापीठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक/ ऑलिम्पिक व पॅरॉलिम्कि क्रीडा स्पर्धेत सहभाग. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वेतनगट - १ व २ करीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा<br>**i) राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा**<br>**ii) राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा**<br>iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>iv) राज्यस्तर ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>v) भारतीय खेळ प्राधिकरण (साई) पुरस्कृत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे (सन २००८ -०९ ते २०१३-१४ कालावधीत आयोजित) १६ वर्षाखालील राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा<br>vi) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)<br>vii) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>viii) राज्यस्तर पॅरा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>ix) राज्यस्तर दिव्यांग क्रीडा स्पर्धा<br>(**टिप-** अ.क्र. i ते vi मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळाचे ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक. | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे/ राज्य स्तरावर संबंधित विभाग/जिल्हयाचे प्रतिनिधित्व करुन संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक मिळविणे आवश्यक. |
| ४ | वेतनगट - १, २ व ३ करीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा | | |
| | i.वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग. | वरिष्ठ गट स्पर्धेत सहभाग. |
| | ii.पॅरॉलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग<br>(**टिप** - अ.क्र. i मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे नमूद देशी खेळ ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) | | |

२. **पात्र स्पर्धांचा तपशील:-**

| **वेतनगट १ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | **वेतनगट २ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
|---|---|
| **१. अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-**<br>i. ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा.<br>ii. एशियन्स गेम्स.<br>iii. जागतिक क्रीडा स्पर्धा.<br>iv. एशियन चॅम्पियनशीप.<br>v. कॉमनवेल्थ गेम्स.<br>vi. कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप.<br>vii. युथ ऑलिम्पिक.<br>viii. ग्रॅडमास्टर (बुध्दिबळ) | **वेतनगट १ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषय अर्हता धारण करणारा खेळाडू**<br>**अथवा**<br>**१. अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-**<br>i. ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप<br>ii. युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>iii. कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>iv. कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>v. आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दिबळ) |
| **२. पॅरॉलिंपिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-**<br>i. पॅरॉलिंपिक गेम्स.<br>ii. पॅरा एशियन गेम्स.<br>iii. वर्ल्ड पॅरॉलिंपिक गेम्स. | **२. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-**<br>i. भारतीय ऑलिंपिक असोशिएशन (IOA) आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (नॅशनल गेम्स)<br>ii. अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) |

| | |
|---|---|
| **३. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा :-**<br>i. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ. | **३. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट**<br>i. राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा<br>**४. पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा :-**<br>i. पॅरा ऑलिंपिक राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा |
| **४. आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :-**<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित केलेले खेळ. | **५. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा** |
| **५. ग्रॅन्ड मास्टर किताब** | **६. राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** |
| | **७. भारतीय खेळ प्राधिकरणाद्वारे (साई द्वारे सन २००८-०९ ते २०१३-१४ कालावधीत आयोजित) १६ वर्षाखालील शालेय क्रीडा स्पर्धा** |
| | **८. केंद्रीय क्रीडा मंत्रालयामार्फत भारतीय खेळ प्राधिकरणाद्वारे आयोजित झालेल्या/होणाऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स** |
| | **९. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा** |
| | **१०. आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा** |
| **वेतनगट ३ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** | **वेतनगट ४ साठी पात्र क्रीडा स्पर्धा** |
| **वेतनगट १ व २ मधील पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा** | **वेतनगट १, २ व ३ मधील पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा.** |
| **१. राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा**<br>i) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | **१. वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग** |
| २. राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | **२. पॅरॉलिंपिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग.** |
| **३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** | |
| **४. राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा** | |
| **५. भारतीय खेळ प्राधिकरण (साई) पुरस्कृत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे (सन २००८ -०९ ते २०१३-१४ कालावधीत आयोजित) १६ वर्षाखालील राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** | |
| **६. राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)** | |
| **७. राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा** | |
| **८. राज्यस्तर पॅरॉलिंपिक क्रीडा स्पर्धा** | |
| **९. राज्यस्तर दिव्यांग क्रीडा स्पर्धा** | |

**३. स्पर्धाविषयक अन्य अटी व शर्ती:-**

**(अ)** (i) उपरोक्त वेतनगट १ व २ मधील स्पर्धा या संबधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा आंतरराष्ट्रीय समितीने स्वत: अथवा इंडियन ऑलिम्पिक असोशिएशन यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

(ii)उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त संबधित मान्यताप्राप्त खेळाच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने/संबंधित खेळाच्या राष्ट्रीय फेडरेशनने आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त स्पर्धेचे आयोजन केलेले असावे. यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी वैयक्तिकरित्या आयोजित केलेल्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

(iii) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (नॅशनल गेम्स)/ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा या:-

१. भारतीय ऑलिम्पिक समितीशी (IOA) संलग्नता/मान्यता असलेली तसेच आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC)/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया (OCA) या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रिडा संघटना यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

अथवा

२. राष्ट्रीय क्रीडा संघटनेस भारतीय ऑलिम्पिक समितीची संलग्नता/मान्यता नसल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया (OCA) या समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रिडा महासंघाशी/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया (OCA) संलग्नता/मान्यता असलेली राष्ट्रीय क्रीडा संघटना यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

अथवा

३. राष्ट्रीय क्रीडा संघटनेवर एकापेक्षा अधिक कार्यकारिणी/संघटना कार्यरत असल्यास अथवा झाल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने संलग्नता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेची कार्यरत असलेली कार्यकारिणी/संघटना अधिकृत समजल्या जाईल किंवा नियुक्त करण्यात आलेली समिती (Ad-hoc Committee) यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

(iv) **राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा या:-**

१. भारतीय ऑलिम्पिक समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या राष्ट्रीय फेडरेशनशी संलग्न असलेली व महाराष्ट्र ऑलिम्पिक समितीशी (MOA) संलग्नता/मान्यता असलेल्या राज्यातील एकविध खेळ राज्य संघटनेद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

अथवा

२. एकविध खेळ राज्य संघटनेस महाराष्ट्र ऑलिम्पिक समितीची संलग्नता/मान्यता नसल्यास: आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती/ऑलिम्पिक/ कौन्सिल ऑफ एशिया, या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशन/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया (OCA) संलग्नता/मान्यता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारा राज्यातील संलग्नता प्राप्त एकविध खेळ राज्य संघटना द्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

अथवा

३. राज्य क्रीडा संघटनेवर एकापेक्षा अधिक कार्यकारिणी/संघटना कार्यरत असल्यास अथवा झाल्यास:- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती/ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशिया या समितीशी संलग्नता/मान्यता असलेल्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनने संलग्नता दिलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेद्वारा राज्यात संलग्नता दिलेली त्या-त्या खेळाची कार्यकारिणी/संघटना किंवा नियुक्त समिती (Ad-hoc Committee) यांनी आयोजित केलेल्या असाव्यात.

(v) ज्या खेळाचा समावेश ऑलिम्पिक, एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स यापैकी कोणत्याही एका स्पर्धांमध्ये आहे अशा खेळांचे बाबतीत उपरोक्त तरतूदी लागू राहतील.

**(आ)** (i) जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धा ही आंतराष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पोर्टस बोर्ड द्वारा आयोजित केलेल्या असाव्यात

(ii) तसेच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा ह्या अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा बोर्डामार्फत आयोजित केलेल्या असाव्यात.

(iii) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धांचे (अश्वमेध) आयोजन संबंधित विद्यापीठाने केलेले असावे.

**(इ)** (i) पॅरा ऑलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा या संबंधित खेळाच्या आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक समितीशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक समितीने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच उपरोक्त स्पर्धा व्यतिरिक्त असलेल्या स्पर्धा मान्यता प्राप्त खेळांच्या असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता प्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात यामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवड ही राष्ट्रीय संघातून झालेली असावी. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धा मध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करता येणार नाही.

(ii) राष्ट्रीय व राज्यस्तर पॅरॉलिम्पिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन संबंधित पॅरॉलिम्पिक खेळ संघटनेने केलेले असावे.

(iii) अपंग क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे आयुक्त, अपंगकल्याण विभाग यांच्यामार्फत करण्यात आलेल्या असाव्यात.

**(ई)** (i) आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा हया आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.
(ii) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा हया भारतीय शालेय क्रीडा महासंघाद्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.
(iii) राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा महिला व ग्रामीण क्रीडा स्पर्धाचे आयोजन (राजीव गांधी खेल अभियान अंतर्गत) क्रीडा व युवक सेवा संचालनालय मार्फत केलेले असावे.

**(उ)** राज्यस्तर अदिवासी क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे आयुक्त, अदिवासी विकास विभागामार्फत करण्यात आलेले असावे.

**(ऊ)** केंद्रशासनाद्वारा यापूर्वी भारतीय खेळप्राधिकरण/पंचायत युवा व क्रीडा अभियाना अंतर्गत आयोजित झालेल्या व आता राजीव गांधी खेलअभियान अंतर्गत आयोजित केल्या जात असलेल्या ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा (वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धा) ह्या भारतीय खेळप्राधिकरण द्वारा आयोजित केलेल्या असाव्यात.

**(ए)** आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सांघिक/ वैयक्तिक स्पर्धेमध्ये किमान १२ देशांच्या संघाचा / वैयक्तिक स्पर्धेमध्ये (वैयक्तिक क्रीडा प्रकार/प्रत्येक वजनी गटात) स्वतंत्रपणे किमान १२ खेळाडूंचा समावेश असावा. सर्व प्रकारच्या राष्ट्रीय / राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये किमान ६०% राज्य/ जिल्हे सहभागी होणे आवश्यक राहील.

## ४. सर्वसाधारण अर्हता :-

**(i)** खेळाडू हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा व त्याला मराठीचे ज्ञान असावे.

**(ii)** सदर खेळाडू संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार पदासाठी आवश्यक असणारी किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त करणारा असावा.

**(iii)** खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणातून सरळसेवेने नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदू नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल उदा. अनुसूचित जातीची खेळाडू व्यक्ती ही अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदूवर गणली जाईल.

**(iv)** राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

**(v)** खेळाडू उमेदवाराच्या मुलाखतीवेळी तसेच मुलाखती नसणाऱ्या परीक्षांमधून द्यावयाच्या अंतिम नियुक्तीपूर्वी खेळाडूंकडे संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक असेल.
(शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. ११.०३.२०१९ नुसार)

**(vi)** खेळाडूंसाठी विहित करण्यात आलेले सदर ५ टक्के आरक्षण वेतनगट- १, २, ३ आणि ४ या गटातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी अनूज्ञेय राहील.

**(vii)** संबंधीत पदासाठी वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट खेळाडूंसाठी शिथील करण्यात येईल. तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करतांना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहिल.

**(viii)** एकाकी पदास आरक्षण लागू राहणार नाही. आरक्षण हे पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय असेल.

**(ix)** समांतर आरक्षण हे कप्पीकृत (compartmentalized) आरक्षण असल्याने त्यातील संवर्गात बदल करता येणार नाही व आरक्षणाचा अनुशेष पुढे नेता येणार नाही. तसेच भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्यात यावे.

x) एखादा उमेदवार वेतनगट १ मधील नेमणूकीसाठी पात्र असेल तर त्याने वेतनगट २, ३ किंवा ४ साठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यास हरकत नाही. परंतू त्याच बरोबर संबंधित उमेदवाराने वेतनगट १ चे पद उपलब्ध झाल्यावर अर्ज केल्यास त्याचा नियमानुसार विचार करण्यात यावा. याचप्रमाणे वेतनगट २ व ३ साठी पात्र उमेदवारांचा विचार करण्यात यावा. मात्र वेतनगट ४, ३ व २ करीता पात्र उमेदवार त्याच्या वरिष्ठ वेतनगटासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. तथापि कोणत्याही वेतनगटामध्ये अर्ज करताना त्या वेतनगटातील पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदींनुसार संबंधित उमेदवाराने अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

**५. क्रीडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी : -**

खेळाडूच्या प्रमाणपत्राची पडताळणी त्वरेने होण्याच्या दृष्टीने संबंधित खेळाडू, संबंधित खेळ संघटना, संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील. (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि.३०.०६.२०२२)

**(i) संबंधित खेळाडूने करावयाची कार्यवाही:-**

साधारणपणे खेळाडूने खेळविषयक प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदरचे प्रमाणपत्र छाननी करण्यासाठी खेळाडू ज्या विभागात वास्तव्यास आहे, त्या विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्याकडे पाठवावे. मात्र परीक्षार्थी खेळाडू उमेदवाराने, ज्या पदाच्या निवडीकरिता दोन किंवा त्यापेक्षा जास्त टप्प्यांवर परीक्षा आयोजित केल्या जातात अशा पदासाठीच्या पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकाआधी किंवा ज्या पदासाठी एकाच टप्प्याची परीक्षा आयोजित केली जाते अशा पदाच्या परीक्षेसाठी अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकाआधी, तो ज्या क्रीडा विभागात वास्तव्यास आहे त्या विभागातील उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे प्रमाणपत्र पडताळणीयाठी अर्ज सादर केलेला असणे बंधनकारक आहे. तसेच खेळाडूने कोणत्या विभागातील उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला आहे हे आवेदन अर्जात नमूद करणे व अर्ज सादर केल्याची पोच पावती सोबत जोडणे बंधनकारक आहे. उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून आधीच प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील. ज्या पदांवरील निवडीसाठी उमेदवाराची मुलाखत घेण्यात येते, अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक आहे अन्यथा सदर उमेदवार, खेळाडू आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. खेळाडू उमेदवाराने, क्रीडा प्रमाणपत्रासंदर्भात कोणतीही बनावट कागदपत्रे सादर केल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येईल.

तथापि, उमेदवाराने भरतीपूर्वी सादर केलेले क्रीडा प्रमाणपत्र हे कुठल्याही तांत्रिक व प्रशासकीय कारणामुळे अवैध ठरले, अशा परिस्थितीत सदर उमेदवारांकडे या व्यतिरिक्त भरतीप्रक्रिये पूर्वीच्या कालावधीतील एकापेक्षा अधिक क्रीडा प्रमाणपत्रे असतील तर अशी सर्व प्रमाणपत्रे त्याने संबधित (शिफारस झालेल्या) कार्यालयामार्फत पडताळणी करीता संबधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचेकडे किमान ७ दिवसात सादर करावीत. उमेदवारांनी याप्रमाणे सादर केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्राथमिक पडताळणी संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी ३० दिवसात करावी त्यानंतर सदर क्रीडा प्रमाणपत्राची पुनर्पडताळणी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या कार्यालयाकडून ३० दिवसात करण्यात यावी. या संबंधिचा क्रीडा प्रमाणपत्र वैध/अवैध अहवाल विहित कालमर्यादेत संबंधित (शिफारस झालेल्या) कार्यालयास पाठविण्यात यावा व संबंधित कार्यालयाने तद्नंतर सदर अहवालाच्या आधारे पुढील योग्य तो निर्णय घ्यावा. (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय ई नस्ती क्र.१२१६३९७/SESD-३८०१५/५/क्रीयुसे-२ दि.०५.०९.२०२५)

**(ii) संबधित खेळाच्या अधिकृत संघटना/संबंधित शासकीय कार्यालयांकडून होणारी कार्यवाही:-**

अधिकृत एकविध संघटनेच्या प्रमाणपत्राची छाननी तसेच आदिवासी, अपंग क्रीडा स्पर्धेच्या, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रांची छाननी संबंधित विभागीय उप संचालक यांना करता यावी याकरिता संबधित खेळाच्या संघटनांनी स्पर्धांचे अभिलेख व्यवस्थितरित्या जतन करावेत व स्पर्धेचे आयोजन संपन्न झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीत, त्या स्पर्धेतील खेळाडूंचे संपूर्ण

अभिलेख संबंधित संघटनेच्या विद्यमान अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीने व शिक्क्याने, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील.

राष्ट्रीय स्तरावर आयोजित होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचे निकाल, संबधित राज्य संघटनेने राष्ट्रीय संघटनेशी समन्वय करुन, राष्ट्रीय संघटना सचिवांच्या सही व शिक्क्यानिशी क्रीडा व युवक सेवा संचालनालयास, राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्यानंतर ३० दिवसात सादर करावेत. राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे निकाल क्रीडा व युवक सेवा संचालनालयास पाठविण्याची जबाबदारी राज्य संघटनेची राहील.

संबंधित स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्था/क्रीडा संघटना/संबंधित शासकीय विभाग यांनी खेळाडूच्या प्राविण्य निश्चितीच्या अनुषंगाने कागदपत्रे/पुरावे विहित नमुन्यात व विहित कालावधीत पोहोचते करण्याची दक्षता घ्यावी.

विहित मुदतीत आवश्यक अभिलेख आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना उपलब्ध करुन न दिल्यास संबधित खेळाडूला त्याच्या प्रमाणपत्राचा पडताळणी अहवाल पाठविणे शक्य होणार नाही व यामुळे खेळाडूच्या होणाऱ्या नुकसानीस संबधित संस्था/खेळ संघटनाच जबाबदार राहील.

**(iii) <u>संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून करण्यात येणारी कार्यवाही:-</u>**

उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्याकडून प्राविण्य निश्चितीसाठी आवश्यक अभिलेख ३ कार्यालयीन दिवसात मागविणे आवश्यक राहील. क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत अभिलेख प्राप्त झाल्यानंतर, त्याआधारे संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी ८ कार्यालयीन दिवसात कार्यवाही करुन क्रीडा प्रमाणपत्र अहवाल देण्याची अथवा नाकारण्याची कारणे नमूद करुन, संबंधित खेळाडूंना अवगत करण्याची कार्यवाही करावी. खेळाडूचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी उपलब्ध झाल्यानंतर कार्यालयीन २० दिवसात प्रमाणित करुन संबधित खेळाडूस प्रमाणपत्र पडताळणी अहवाल उपलब्ध करुन देणे संबंधित उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्यावर बंधनकारक राहील. सदरचा अहवाल/निर्णय उप संचालक, क्रीडा यांनी संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील. जेणेकरुन भविष्यात खेळाडूच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यास क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल तात्काळ उपलब्ध करुन देता येईल.

उमेदवाराच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद वाटणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशाप्रकारची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२ दि.३०.०६.२०२२ मधील परिच्छेद क्र.५.१.१ अनुसार गठीत समितीसमोर उमेदवारास उपस्थित राहण्याबाबत सूचीत करता येईल. सदर खेळाडूची कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिके यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे आवश्यक वाटल्यास, त्याबाबत संबंधित विभागीय उप संचालक स्तरावर निर्णय घेता येईल. शासन सेवेत निवड झालेल्या खेळाडू उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीस विलंब झाल्यास व त्यामुळे नियुक्ती देण्यास उशीर झाल्यास अथवा नियुक्तीसंदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास याबाबतची जबाबदारी उप संचालक, क्रीडा यांची राहील.

तसेच संबंधित विभागीय उपसंचालक यांच्यामार्फत कळविण्यात आलेल्या निर्णयावर खेळाडूला आक्षेप असल्यास याबाबत खेळाडूस निर्णय प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे यांच्याकडे प्रथम अपील करता येईल. प्राप्त होणाऱ्या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याची कार्यवाही सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा हे करतील. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या निर्णयावर आक्षेप असल्यास आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे द्वितीय अपील करता येईल.

**(iv) <u>आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडून होणारी कार्यवाही:-</u>**

राज्यस्तरीय/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजत संपन्न झाल्यानंतर संबधित खेळाच्या राज्य संघटनेकडून प्राप्त झालेल्या निकालाची/अभिलेखाची छाननी करुन सदरचा निकाल, सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या कार्यालयाकडे गुगल ड्राईव्ह/गुगल क्लाऊड द्वारे उपलब्ध करुन देण्यात यावा. विहित मुदतीत स्पर्धेचा निकाल/अभिलेख जमा न करणाऱ्या संघटनांना, स्पर्धेबाबतचा अभिलेख जमा करण्याबाबत तीन

वेळा पत्राद्वारे सूचित करण्यात यावे. तद्नंतरही संघटनेकडून अभिलेख प्राप्त न झाल्यास, खेळाडूच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबधित खेळाच्या राज्य व राष्ट्रीय संघटनांची संलग्नता रद्द करण्याची शिफारस अनुक्रमे महाराष्ट्र ऑलिम्पीक असोसिएशन व इंडियन ऑलिम्पीक असोसिएशन यांना संचालनालय स्तरावरुन करण्यात यावी.

संबधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून, खेळाडू प्रवर्गातून शिफारस झालेल्या उमेदवारांचे क्रीडा प्रमाणपत्र, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे पुनर्पडताळणीसाठी प्राप्त झाल्यावर, सदर प्रमाणपत्रांच्या पात्र अपात्रतेसदर्भात, संबधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना व संबंधित खेळाडूस १५ दिवसांच्या आत अवगत करण्यात यावे. तसेच खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसंदर्भात प्राप्त होणाऱ्या द्वितीय अपीलावर सुनावणीचे अधिकार आयुक्त क्रीडा व युवक सेवा यांना राहतील. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे, बोगस खेळाडू प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने संबधित उमेदवाराची प्रात्यक्षिक व कौशल्य चाचणी घेण्याचे, त्यानुसार संबधित उप संचालक, क्रीडा यांनी दिलेल्या पडताळणी अहवाल रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

तसेच यापूर्वी निवड/नियुक्ती झालेल्या उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्राच्या अनुषंगाने प्राप्त गंभीर तक्रारी, स्पर्धेबाबतचा अभिलेख संशयास्पद असणे, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल देण्याकरिता आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे अशा स्वरुपाची ठोस कारणे असलेल्या प्रकरणी, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना संबंधित उमेदवारांच्या क्रीडा प्रमाणपत्रासंदर्भात सखोल तपासणी करण्यासाठी कौशल्य चाचणी तसेच प्रात्यक्षिके घेता येतील, या संदर्भात आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांचा निर्णय अंतीम राहील. सदर खेळाडूंची कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिके यांचे व्हिडिओ रेकॉर्डिग करणे आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना बंधनकारक असेल.

त्याचप्रमाणे खेळाडू प्रमाणपत्र वैध ठरलेल्या खेळाडूंच्या नावाची अद्ययावत यादी वेळोवेळी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत विभागनिहाय प्रसिध्द करण्यात येईल.

(v) **<u>सेवाप्रवेश विभागाने करावयाची कार्यवाही :-</u>**

खेळाडू प्रवर्गातून प्राप्त झालेल्या अर्जासोबत योग्य त्या क्रीडाप्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरिता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास परीक्षेच्या पहिल्या टप्प्यातच अर्ज नाकारण्यात यावेत. ज्या पदांवरील निवडीसाठी उमेदवाराची मुलाखत घेण्यात येते अशा पदांच्या मुलाखतीवेळी संबंधित खेळाडूकडे क्रीडा प्रमाणपत्राच्या पात्रतेचा अहवाल असणे बंधनकारक आहे. निवड प्राधिकाऱ्यांनी खेळाडू प्रवर्गातून नियुक्तीसाठी पात्र असलेल्या खेळाडूंबाबत, त्या खेळाडूने आवेदन अर्जासोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे/माहिती यासह परीक्षेचा निकाल संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळवावा.

(vi) **<u>नियुक्ती अधिकाऱ्यांनी करावयाची कार्यवाही:-</u>**

सरळसेवा भरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांची क्रिडा प्रमाणपत्रे पुनर्पडताळणीसाठी आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावीत. आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांनी वैध खेळाडू प्रमाणपत्र अहवाल दिल्याशिवाय संबंधित उमेदवारास नियुक्ती अधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत नियुक्ती अथवा प्रशिक्षण देऊ नये. तथापि, यानुसार कार्यवाही न केल्यास व त्यामुळे भविष्यात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याकरिता संबंधित नियुक्ती अधिकारी जबाबदार राहतील.

(vii) नियुक्ती अधिकारी हे खेळाडूने सादर केलेले प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक यांनी पडताळणी करून क्रीडा विभागाच्या संकेत स्थळावर अपलोड केलेल्या क्रीडा प्रमाणपत्रासंदर्भातील माहितीशी पडताळून पाहतील.

(viii) एखाद्या खेळाडूकडे एका पेक्षा जास्त खेळांची राज्य / राष्ट्रीय स्पर्धांची प्राविण्य प्रमाणपत्रे असू शकतील अशा खेळाडूने एकाच वेळेस सर्व प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. संबंधित पदाच्या भरतीसाठी सादर केलेल्या अर्जात, खेळाडूने जे प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना पडताळणीसाठी सादर केली असल्याचा दावा केला असेल केवळ त्याच प्रमाणपत्रांच्या पात्रतेचा अहवाल नियुक्तीच्या पुढील प्रयोजनार्थ गृहीत धरला जाईल

या तरतुदीखेरीज अन्य खेळातील आणि परीक्षेच्या अन्य कोणत्याही टप्प्यावर सादर करण्यात येणारे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणी अहवाल कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

**(ix)** संबंधित पदाच्या भरतीसाठी जाहिरात आल्यास अर्ज करताना खेळाडूने उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करून मिळण्याबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती अथवा खेळाडूस उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्र पडताळणी अहवाल जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत उपरोक्त तपशील सादर न करणाऱ्या उमेदवारांचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

**(x)** सदर सूचना ५% खेळाडू आरक्षणा अंतर्गत खेळाडूंद्वारे आगामी दाखल करण्यात येणारे अर्ज, संबंधित उपसंचालक (क्रीडा) यांचेकडे पडताळणीसाठी (Verification) केलेले अथवा प्रलंबित अर्ज, सह संचालक (क्रीडा) यांचेकडे केलेले प्रथम अपील, आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांच्याकडे केलेले द्वितीय अपील या प्रकरणांना तसेच क्रिडा संचालनालयाकडे पुनर्पडताळणीसाठी प्रलंबित असलेल्या व मा.उच्च न्यायालय अथवा मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे या शासन निर्णयापूर्वी दाखल असलेल्या याचिका या सर्व प्रकरणांना देखील लागू राहतील.
(शासन शुध्दीपत्रक क्र. खेआक्ष-२७२५/प्र.क्र.३६/क्रीयुसे-२ दि.२८.०५.२०२५ नुसार समाविष्ट)

## ६. सरळसेवा भरतीबाबत करावयाची कार्यवाही : -

**(i)** ५ टक्के आरक्षणांतर्गत क्रीडा संवर्गातून वेतनगट १, २, ३ व ४ मधील पदांच्या भरतीसाठी जाहिरात देतांना परिच्छेद क्र. १ व २ मधील तक्त्यांमध्ये नमूद असलेल्या पात्र स्पर्धांचा/ खेळांचा उल्लेख जाहीरातीमध्ये करण्यात येईल.

**(ii)** खेळाडूंच्या सदर आरक्षणाची अंमलबजावणी करतांना अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, इतर मागास वर्ग व खुला प्रवर्ग यांचेसाठी जी पदे उपलब्ध होतील त्या त्या प्रवर्गातील ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतील.

**(iii)** खेळाडुंच्या समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि.१३.०८.२०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि.१९.१२.२०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**(iv)** खेळाडूंसाठी विहीत करण्यात आलेले ५ टक्के आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीसाठी अनुज्ञेय राहील.

**(v)** खेळाडू आरक्षण हे समांतर आरक्षण/विशेष आरक्षण असल्यामुळे आडवे आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्यामुळे पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करतांना तसेच भरतीची जाहिरात देतांना त्या जाहिरातीत खेळाडू आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सामाजिक आरक्षण उभे आरक्षण यांच्या (जसे अ.जा, अ.ज, वि.जा.(अ), भ.ज.(ब), (क), (ड), वि.मा.प्र., इमाव, सा.शै.मा.प्र., आ.दु.घ., खुला प्रवर्ग) प्रत्येक वर्गामध्ये निर्देशित करावी. सदर आरक्षणाकरीता क्रीमीलेअर ची अट लागू राहणार नाही. (शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १८.०८.२०१६ नुसार)

## ७. नियुक्ती अधिकारी : -

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कर्मचारी सेवाविनियम -२००५ मधील तिसऱ्या अनुसूची मध्ये विहीत करण्यात आलेले नियुक्ती अधिकारी राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना नियुक्ती देण्यास सक्षम असतील.

*********